दैनिक
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे    Email : newsaksharaj2021@gmail.com

● वर्ष ०२ रे ● अंक २५६ वा ● पाने ०४ ● ठाणे, रविवार, दि.०६ जुलै २०२५ ● किंमत : ३ रुपये ● RNI NO.: MAHMAR/2022/82056












# माझ्या आणि राजमधला अंतरपाट अनाजीपंतांनी दूर केला, एकत्र आलोय एकत्र राहण्यासाठी : उद्धव ठाकरे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** बऱ्याच वर्षांनी राज आणि माझी भेट व्यासपीठावर झाली. पंचाईत अशी आहे, की त्याने मला सन्माननीय उद्धव ठाकरे असं म्हटलं आहे. साहजिकच आहे की त्याचंही कर्तृत्व आपण सर्वांनी पाहिलेलं आहे. म्हणून माझ्या भाषणाची सुरुवात सन्माननीय राज ठाकरे आणि जमलेल्या माझ्या मराठी हिंदू बांधवांनो आणि भगिनींनो.. अशी करतोय. वैयक्तिक मला वाटतं, की आमच्या भाषणापेक्षा आमचं एकत्रित दिसणं महत्त्वाचं आहे. ज्यांनी मराठी भाषेसाठी पक्षभेद विसरुन उपस्थिती लावली त्यांचे आभार, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाषणाला सुरुवात केली.



**काय म्हणाले उद्धव ठाकरे?**

आम्हा दोघांमधला अंतरपाट अनाजीपंतांनी दूर केला. एकत्र आलोय एकत्र राहण्यासाठी. आज भोंदूबाबा-महाराज व्यस्त असतील, कोणी टाचण्या टोचतंय, कोणी अंगारे धुपारे करतंय, कोणी रेडे कापतंय, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. या नतद्रष्टांचा अनुभव घेतला, वापरायचं आणि फेकून द्यायचं. आता आम्ही दोघं मिळून तुम्हाला फेकून देणार आहोत, असा इशाराही उद्धव ठाकरेंनी दिला. डोक्यावर बाळासाहेबांचं छत्र नसतं तर काय केलं असतं? कोणत्या भाषेत बोलत होतात? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी विचारला.

राजने सगळ्यांची शाळा काढली, मला एक प्रश्न पडला आहे, नरेंद्र मोदी यांची शाळा कोणती? सगळ्यात उच्चशिक्षित आहेत. भाजप ही अफवांची फॅक्टरी आहे. मधल्या काळात यांनी सुरु केलं होतं, की उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडलं, पण हिंदुत्व ही कुठल्याही भाषेची मक्तेदारी नाही. आम्ही अस्सल मराठी बोलणारे तुमच्याहीपेक्षा जास्त कडवट, कट्टर देशाभिमानी हिंदू आहोत. तुम्ही काय आम्हाला हिंदुत्व शिकवणार? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी विचारला.

हिंदीसक्तीच्या विरोधातील निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने मागे घेतल्यानंतर मनसे आणि ठाकरेसेना यांच्याकडून वरळीत विजयी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. वरळी डोम परिसरात मनसे आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांची तुफान गर्दी झाली आहे. या सोहळ्याला रश्मी ठाकरे, तेजस ठाकरे, आदित्य ठाकरे, अमित ठाकरे, शर्मिला ठाकरे असे कुटुंबीय उपस्थित आहेत. याशिवाय संजय राऊत, सुभाष देसाई, अनिल देसाई, प्रियांका चतुर्वेदी, किशोरी पेडणेकर, मनसेचे माजी आमदार राजू पाटील, संदीप देशपांडे, अविनाश जाधव उपस्थित होते.

**ठाकरे बंधू एकत्र, आव्हानं किती?**

मराठीच्या मुद्द्यावरुन बाळासाहेब ठाकरे यांनी १९६६ मध्ये शिवसेनेची स्थापना केली. त्याच बाळासाहेब ठाकरेंचे पुत्र आणि पुतण्या ५९ वर्षांनी मराठीच्याच मुद्द्यावरुन सोबत आले. सरकारच्या हिंदी सक्तीविरोधात ठाकरेंनी रान उठवलं. यानंतर दोघांचा संयुक्त मेळावा आज संपन्न झाला.

भाषेचा मुद्दा मराठी माणसासाठी भावनिक आहे. त्या मुद्द्यावरुन एका कार्यक्रमात एका मंचावर येणं सोपं होतं. पण दोन स्वतंत्र पक्ष चालवत युती करुन राजकारण करणं सोपं नाही. कारण युतीमध्ये अनेक मर्यादा येतात. याची जाणीव दोन्ही ठाकरेंना आहे. पक्षावरील वर्चस्वावरुन झालेल्या वादातूनच राज ठाकरे यांनी त्यांची वेगळी वाट धरली आणि मनसेची स्थापना केली. आता पुन्हा एकत्र येताना तडजोडी कराव्या लागतील. मुंबई महापालिकेवरील सत्तेमुळेच शिवसेना टिकली आणि वाढली हे निर्विवाद सत्य आहे. आता त्याच महापालिकेवरील सत्ता टिकवण्याचं आव्हान उद्धव यांच्यासमोर आहे. पालिका हातातून गेल्यास उद्धव यांच्या पक्षाची स्थिती आणखी बिकट होईल. तर दुसरीकडे राज ठाकरे यांच्याकडे गमावण्यासारखं काही नाही. गेल्या २ दशकांपासून त्यांच्या पक्षानं सत्ता पाहिलेली नाही. उद्धव यांच्या पक्षासोबत युती केल्यास, त्यामुळे मुंबईत वारं फिरल्यास राज यांच्या पक्षाला थोडे बरे दिवस येऊ शकतात.

मोठ्या माणसांचे इगोही तितकेच मोठे असतात, असं म्हटलं जातं. खरी गोम इथेच आहे. तू मोठा की मी मोठा, हा प्रश्न दोघांसाठी महत्त्वाचा आहे. इगोचा प्रश्न सुटला तर अन्यही प्रश्न सुटतील. पक्षावरील वर्चस्वातूनच राज ठाकरे वेगळे झाले. आता युतीवरील वर्चस्वातून खटके उडाल्यास ठाकरे बंधूंच्या हाती फार काही लागणार नाही. राज ठाकरे आक्रमक भाषण करतात. त्यांची शैली बाळासाहेबांसारखी आहे. पण युती चालवत असताना उद्धव ठाकरेंना राज यांची आक्रमकता किती आवडेल हा प्रश्न आहे. मुंबई, ठाणे महापालिका निवडणुकीसाठी मनसेनं ५० टक्के जागांची मागणी केल्याचं शिवसेना उबाठातील सूत्रं सांगतात. ही मागणी उद्धवसेनेला मान्य नाही. २०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत उद्धव यांच्या नेतृत्त्वातील एकसंध शिवसेनेला ८४ जागा मिळाल्या होत्या. तर मनसेला केवळ ७ जागांवर समाधान मानावं लागलं होतं. हा फरक मोठा असल्यानं उद्धवसेना ५० टक्के जागा मनसेला सोडण्यास तयार नाही.

दोन्ही ठाकरेंच्या पक्षांचे प्रभाव असलेले मुंबईतील प्रभाग सारखेच आहेत. गिरगाव, दादर, वरळी, प्रभादेवी, चेंबूर, विक्रोळी, भांडूप, मुलुंड यांच्यासोबतच पश्चिम उपनगरात दोन्ही पक्षांचं प्राबल्य आहे. इथले अनेक प्रभाग कित्येक वर्षे सेनेकडे राहिलेले आहेत. सेनेच्या याच गडांना २०१२ मध्ये मनसेनं सुरुंग लावला आणि पालिका निवडणुकीत २८ जागा जिंकल्या. यातल्या बहुतांश जागा शिवसेनेनं २०१७ च्या निवडणुकीत जिंकल्या. याच जागा युतीच्या बोलणीत कळीच्या ठरु शकतात. हक्काच्या जागा सोडण्याची तयारी कोण दाखवणार हा मुद्दा महत्त्वाचा आहे. इथेच ठाकरेंची कसोटी लागेल आणि त्यांचं भवितव्य ठरेल.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.०५, पंढरपूर :** आषाढी शुद्ध एकादशी निमित्ताने वाखरी येथे पोहोचलेल्या आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन घेतले. श्री. फडणवीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समवेत पालखी खांद्यावर घेऊन दिंडी सोहळ्यात सहभाग घेतला. टाळ मृदंगआणि विठू माऊलीच्या गजरात वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले. प्रारंभी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे श्री माऊलींची प्रतिमा देऊन स्वागत केले.

वाखरी येथे जिल्हा प्रशासनाने वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधांची पाहणीदेखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. वारकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार गोपीचंद पडळकर, अभिजित पाटील, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस विशेष महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह हजारो वारकरी भाविक उपस्थित होते.

# शक्तीपीठ मार्ग रद्द करण्यासाठी शेतकरी संघटनेचे विठ्ठलाला साकडे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०५, पंढरपूर :** राज्यातील शेतक-यांची संपुर्ण कर्जमुक्ती करावी व राज्यातील जनतेवर अन्यायकारक असणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची सदबुध्दी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुचावी. यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी व विधीमंडळातील गटनेते आ. सतेज पाटील, खा. प्रणिती शिंदे यांनी पंढरपूर येथील महाराष्ट्रातील गोरगरीब व कष्टकरी जनतेचे आराध्य दैवत पांडूरंगास साकडे घातले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ६ जुलै रोजी पंढरपूर येथे पांडुरंगाची सपत्नीक शासकीय पूजा करणार आहेत. या पुजेच्या आधी मुख्यमंत्र्यांनी विधानसभा निवडणुकीत दिलेला राज्यातील शेतक-यांचा सात बारा कोरा करून संपुर्ण कर्जमुक्तीच्या निर्णयाची तातडीने अमलबजावणी करावी. तसेच राज्यातील जनतेवर व शेतक-यावर अन्यायकारी ठरणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची सुबुध्दी सुचावी या मागणीसाठी पंढरपूरात आज शेतक-यांना मोठी गर्दी केली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चौकातून सर्व शेतकरी एकत्रित येत विठ्ठल मंदिरासमोरील नामदेव पायरीवर पांडुरंगास अभिषेक घालून साकड घालण्यात आले. राज्य सरकारला जर शेतक-यांची कर्जमाफी करण्यास व शक्तीपीठ रद्द करण्याची सुबुद्दी सुचली नाही तर या सरकारच्या विरोधात लढण्याची ताकद देण्याचे साकड घालण्यात आले.यावेळी शेतकरी संघटनेचे सचिन दादा पाटील, रवी मोरे तानाजी बागल, दामू इंगोले विजय रणदिवे, किशोर ढगे शिवाजी भाऊ पाटील, अजित बोरकर, किरणराज घाडगे, प्रताप गायकवाड संदीप पाटील राहुल पाटील महादेव शिंदे अजिनाथ परबत सचिन ताटे नितीन शिंदे शहाजहान शेख बंडू सावळे नामदेव पवार इ तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## भगवान विठ्ठल ब्रम्हांडाचे पालनहार

पांडुरंग हे विष्णुचा अवतार आहे.त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत. परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या(विठ्ठलाच्या)रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे. आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो. जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या ह्रुदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठोबा. मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात. याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात. वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे. कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक, वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन. महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते.कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही, कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे. त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.

असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात. आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची, तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात. एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात. विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे. विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो. मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला. अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळविण्याचा निश्चय केला. अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले.या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन एकादशी देवता उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.हीच ती आषाढी एकादशी होय. या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८४ वर्षांची ओळख आहे. आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली. ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्री संत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते. त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे.असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्री संत कोलबाजी महाराजांनी स्वतःला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थीत चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात.त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते. देवतांवर विजय मिळविण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली. अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत ३ दिवस लपून बसले. यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुममान्य राक्षसाचा वध केला.असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे. यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे.आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजार जमीन आहे. या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.

आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते. म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले. याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड, बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी, सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे. यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे. कारण प्रत्येक झाडात, पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्याअर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल.त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गालीचा सम्द ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.

**जय हरी विठ्ठल! पांडुरंग हरी!**

# पंढरीची वारी घडली पाहिजे !

दहावी अथवा बारावीची परीक्षा नापास होणाऱ्यांसाठी मार्चनंतर ऑक्टोबरची परीक्षा देता येत असे. त्यातही फेल झाल्यास पुन्हा मार्चला बसावं लागायचं. मग अशा एकामागून एक परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याला लोक 'आमक्या आमक्याची ऑक्टोबर-मार्चची वारी सुरू आहे!' असं म्हणून चिडवायचे. तो बिचारा तोंड लपवून फिरायचा. अशा रीतीने शैक्षणिक क्षेत्रात 'वारी' ची संकल्पना चुकीच्या पद्धतीने वापरल्यामुळे मी त्याकाळी वारी या शब्दाला काहीसा बिचकत होतो. नंतर जेव्हा आषाढी, चैत्र, कार्तिकी, माघ या वारी सोहळ्याची माहिती मिळू लागली, तसतसं वारीचं अस्सल रूप माझ्या ध्यानात येऊ लागलं.

तेव्हा वाटायचे एवढे लाखो लोक पूर्ण एक महिना असे त्याग पूर्ण जीवन जगून स्वतःला पीडा का देत असतील? वाहतुकीच्या साऱ्या सुविधा असतानाही ३०० ते ४०० किलोमीटर पायी चालत पंढरपूरला येऊन, श्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन त्या बदल्यात काय मागत असतील ? मग समजलं काहीतरी मागणं मागणे हा भाव वारीत नसतोच. मुक्ती मिळवणे असाही काही अलौकिक भाव या वारीत नसतो. लोक पंढरपूरच्या दिशेने मुक्काम दर मुक्काम करीत येत असतात ते अंतरंगातील अहंकार, लोभ, मोह, क्रोध यांच्या पाशाचे एकेक पदर वा बंध सोडवण्यासाठी.आणि एकच मागणं मागतात ते म्हणजे प्रेम!

वारी हे मराठी सांस्कृतिक परंपरेचे वैभव आहे. असा अनुपम सोहळा जगाच्या पाठीवर कुठेही दिसत नाही. 'वारी' हा भक्तीचा सोहळा आहे. आनंदाचा मेळा आहे.वारीची ही परंपरा गेले कित्येक वर्ष सुरू आहे. किती आले आणि गेले त्यामध्ये खंड पडला नाही. ही परंपरा पुढे देखील अशीच चालू राहणार आहे. हा सोहळा घडतो तर कसा?

**संपदा सोहळा। नावडे मनाला।।**
**लागला टकळा। पंढरीचा।।**
**जावे पंढरीसी। आवडी मनासी।।**

कई एकादशी। आषाढी ये।। या संत तुकाराम महाराजांच्या अभंगास शिरसावध्य मानून लाखो धवलवस्त्राधरी वारकरी पंढरीची वाट धरतात. गरीब - श्रीमंत, जाती-पाती यांसारख्या भेदांच्या पलीकडील समतेची शिकवण प्रत्यक्ष आपल्या कृतीतून देत ही वारी सुरू होते .समस्त भाविक लौकिक जीवनातील ओळख विसरून फक्त 'वारकरी' म्हणून वारीमध्ये सहभागी होतात. विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी चालणे, देहभान हरपून नाचणे,फुगड्या खेळणे, तसेच एकत्र भोजन, सायंकाळी भजन आणि कीर्तन यामधून मिळणारा निर्भेळ असा आनंद वारीमधून ते मिळवतात .वारीमध्ये वारकरी एकमेकांच्या पाया पडतात. यामधून मानवी मनातील अहंकार नावाचा दोष नष्ट होतो.

महाराष्ट्र,कर्नाटक, आंध्र या प्रांतात यादवकालापासून जे संप्रदाय उपासना मार्ग चालू आहेत. त्यामधील वारकरी संप्रदाय हा सर्वात प्राचीन असा आहे. म्हणून त्याला 'आदी संप्रदाय' म्हटले आहे.

वारी परंपरेचा शोध घेतल्यास श्री ज्ञानेश्वर माऊलींनी साडेसातशे वर्षांपूर्वी स्वतः ज्येष्ठ वद्य अष्टमीला,'माझ्या जीवाची आवडी पंढरपुरा नेईन गुढी', असे म्हणत पंढरपुरात प्रस्थान केले होते. त्यापूर्वीही वारीची परंपरा अस्तित्वात होती. शिलालेख -ताम्रपटातून वारी परंपरा श्री विठ्ठल मंदिर, यावर संशोधन झाले आहे. पंढरपुरात आतापर्यंत जे शिलालेख उपलब्ध झालेले आहेत त्यांमध्ये शके ११५९ (इ.स.१२३७) होयसाळ राजाच्या कारकिर्दीतील शिलालेख आहे. तो सोळा खांबी मंडपाच्या तुळईवर तिन्ही बाजूने लिहिलेला आहे. तो संस्कृत आणि कानडी अशा संमिश्र




भाषेत, देवनागरीलिपीत आहे. त्याच्यात पुंडलीक मुनींचा व विठ्ठल देवाचा उल्लेख आहे. तसेच वारीचाही उल्लेख आहे. पंढरीच्या वारीचा हा सर्वात प्राचीन उल्लेख होय. तसाच दुसरा महत्त्वाचा शिलालेख शके ११९५ (सन १२७३) मधील, याला 'चौऱ्यांशीचा शिलालेख' म्हणतात. या शिलालेखात पंढरपुरास 'फागनीपूर' व विठोबास 'विठ्ठल' असे म्हटले आहे. याच्यात रामचंद्रदेव यादवाचा उल्लेख आहे. त्यात त्यांना 'पांढरीफडमुख्य' म्हणून संबोधले आहे. शालिवाहन शके १११० मधील एका प्राचीन शिलालेखात विठ्ठल देवाचा उल्लेख आलेला आहे. हा शिलालेख देऊळ बांधले याविषयी आहे.त्यात देवालय बांधणारांची नावे आलेली आहेत. त्याचबरोबर ताम्रपटांमध्ये पंढरपूरचे 'पांडुरंगपल्ली' असे नाव आहे.हा ताम्रपट शके ४३८ म्हणजे इ.स. ५१६ चा आहे.पंढरी ह गाव शालीवाहन शकाच्या प्रारंभापासून वसलेला आहे. विठ्ठल मंदिर त्यावेळेपासून आहे.

पंढरीची वारी ही संत तुकाराम महाराजांच्या घराण्यात चालू होती. संत तुकाराम महाराज सांगतात -

**पंढरीची वारी आहे माझे घरी।**
**आणिक न करी तीर्थव्रत।।**
**व्रत एकादशी करीन उपवासी।**
**गाईन अहर्निशी मुखी नाम।।**
**नाम विठोबाचे घेईन मी वाचे।**
**बीज कण्यांतीचे तुका म्हणे।।**

श्री संत तुकाराम महाराज ह चौदाशे टाळकऱ्यांसह आषाढी वारीला श्री क्षेत्र देहू गावाहून श्री क्षेत्र पंढरपूरला प्रतिवर्षी जात असत. महाराजांच्या प्रयाणानंतर हा दिंडी सोहळा त्यांचे बंधू कान्होबा यांनी चालवला. कान्होबांच्या निधनानंतर संत तुकाराम महाराजांचे पुत्र नारायण बाबांनी याला पालखी सोहळ्याचे रूप दिले. ज्याप्रमाणे भरताने श्रीरामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून त्याची पूजा करून राज्यकारभार केला.त्याचप्रमाणे नारायण महाराजांनी श्री तुकोबांच्या आणि श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत ठेवून पादुकासह 'ज्ञानोबा-तुकाराम' असे भजन करत पालखी सोहळा सुरू केला. ज्ञानोबा तुकोबा आपल्यासोबत आहेत त्यांच्या समागमे आपण पंढरपूरला चाललो आहोत अशी वारकऱ्यांची धारणा असते. १८३१ च्या पुढे आळंदीहून ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा स्वतंत्र सोहळा हैबतबाबा आरफळकर यांनी सुरू केला. त्याचबरोबर वारकऱ्यांची फड ही संस्था तेराव्या शतकापूर्वीची आहे.

महाराष्ट्राच्या कोकण, विदर्भ, मराठवाडा, खानदेश अशा सर्व कानाकोपऱ्यांतून अनेक संतांच्या नावे अनेक पालख्या आषाढी वारीस पंढरपूरला येतात. या पालख्यांची संख्या नेहमी वाढत जात आहे . सध्या २५० ते ३०० पालख्या येतात. या पालख्यांसमवेत एकूण सुमारे ४ ते ५ लाख वारकरी पायी पंढरपूरला येत असतात.आणि हे पालखी सोहळे गेली अनेक वर्षे सातत्याने येत आहेत. हे सातत्य, हा नियमितपणा म्हणजेच 'वारी'.

संत एकनाथ महाराज (पैठण, औरंगाबाद), संत निवृत्ती महाराज (त्र्यंबकेश्वर, नाशिक), संत चांगाटेश्वर महाराज (सासवड, पुणे), संत सोपानदेव महाराज (सासवड, पुणे)

संत मुक्ताबाई (मुक्ताईनगर, जळगाव), रुक्मिणी माता (कौडन्यपूर, अमरावती), संत तुकाराम महाराज (देहू, पुणे), संत ज्ञानेश्वर महाराज (आळंदी, पुणे), संत नामदेव महाराज (पंढरपूर, सोलापूर), संत निळोबाराय महाराज (पिंपळनेर, अहमदनगर), श्री गुरु जनार्दन स्वामी (दौलताबाद छ. संभाजीनगर), श्री गुरु बाबाजी चैतन्य महाराज (ओतूर, जुन्नर, पुणे), संत गजानन महाराज( शेगाव, बुलढाणा) या संतांच्या पालख्या श्री क्षेत्र पंढरपूरला दरवर्षी आषाढी यात्रेला येतात. याचबरोबर लहान मोठ्या पालख्याची संख्या फार मोठी आहे.

जीवनात येऊन एक तरी आषाढी वारी केली पाहिजे. मनातील मळभ दूर होण्यासाठी, काही काळासाठी का होईना माणसाने संसारिक जीवनाचा त्याग केला पाहिजे. स्वतःचे शरीर स्वच्छ करण्यासाठी दररोज स्नान करणारा माणूस अंतर्मनाच्या स्वच्छतेसाठी वेळ देतो नाही. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात...

**नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ।।**
**तैसे चित्तशुद्धी नाहीं । तेथें बोध करील काई ।।**

चित्त शुद्ध होण्यासाठी रोजच्या धकाधकीच्या जीवनातून अलिप्त होऊन स्वतःचा शोध घेण्यासाठी, संसारीक माणसाची जीवनात एकदा तरी पंढरीची वारी घडली पाहिजे.

**किशोर जाधव, सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**



# ती फक्त ४० दिवसांची होती... आणि तिचा सौदा झाला ; पुण्यातील संतापजनक प्रकार!

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०५, येरवडा (पुणे) :** पुणे शहरात मानवी संवेदनशीलतेला हादरवून टाकणारी आणि समाजमनाला सुन्न करणारी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अवघ्या ४० दिवसांच्या चिमुकलीची अवैध रित्या तीन लाख पंचावन्न हजार रुपयांमध्ये विक्री करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी येरवडा पोलिसांनी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करत त्यांना अटक केली आहे.

ही घटना दिनांक २ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत, शिवतेजनगर बिबवेवाडी व शास्त्रीनगर येरवडा परिसरात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बालिकेचे जैविक पालक मिनल ओंकार सपकाळ (वय ३०) आणि ओंकार औदुंबर सपकाळ (वय २९) यांनीच ही विक्री एजंटांच्या मदतीने केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणी पोलिस हवालदार सचिन लहु गवळी (वय ४२) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, आरोपींनी कोणतीही कायदेशीर दत्तक प्रक्रिया न करता सरळ बेकायदेशीर पद्धतीने ही बालिका इतरांकडे सुपूर्त केल्याचे निष्पन्न झाले आहे.

अटक करण्यात आलेले आरोपी

१. मिनल ओंकार सपकाळ (३०, व्यवसाय – घरकाम)

२. ओंकार औदुंबर सपकाळ (२९, व्यवसाय – टूर मॅनेजमेंट)

३. साहिल अफजल बागवान (२७, एजंट व तरकारी व्यवसाय, रा. वाई, जि. सातारा)

४. रेश्मा शंकर पानसरे ऊर्फ अवताडे (३४, व्यवसाय – मेस चालवते)

५. सचिन रामा अवताडे (४४, व्यवसाय – चालक)

६. दिपाली विकास फटांगरे (३२, व्यवसाय – शिवणकाम, रा. संगमनेर)

सर्व आरोपींना दिनांक ४ जुलै २०२५ रोजी सायंकाळी १६:१५ वाजता येरवडा पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आणि चिंताजनक असून, बेकायदेशीर मानवी व्यवहाराचे भयावह वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.पोलीस यंत्रणेकडून बालिकेची सुरक्षितता सुनिश्चित करण्यात आली असून, या अवैध व्यवहारात आणखी कोणी सहभागी आहे का याचा तपास सुरू आहे. या प्रकरणाचा येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली, सहायक पोलीस निरीक्षक लामखडे पुढील तपास करत आहेत. समाजात संतापाची लाट; माणुसकीच्या सीमारेषा ओलांडल्या जात असल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## वारीत..

वारीचा इव्हेंट करी
नाठाळ जन काही
नेते सामील वारीत
जयकार दिशादाही

नाव पांडुरंगाचे घेई
स्वार्थआपला पाही
टाळ मृदुंग बडवत
नीत प्रकाशांत राही

भक्ती रसात डुंबले
कोण देणारं ग्वाही
व्हॅनिटी व्हॅन सोबत
जया चालवत नाही

सेलिब्रिटी वारीचाले
सोयीसगळ्या शाही
वारीचे चित्र बदलले
सोबत जुडले व्याही

मिडीयाकव्हर करते
ब्रेकिंग न्यूज प्रवाही
फक्तव्यवसाय पाही
उद्योग पति आग्रही

जग हे मिटू द्या डोळे
विठुराया सगळेपाही
खरे वारकरी निस्पृह
भक्ती भावा दे ग्वाही

एकतरी करावी वारी
मन मात्र हवे निर्मोही
पुनश्च सुस्वरूप वारी
पंढरीनाथा त्राहीत्राही

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज

# गोरख नारकर यांचे उद्यापासून प्रांताधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०५, पाटण (सातारा) :** पाटण, कराड-चिपळूण महामार्गाच्या निकृष्ठ कामावर कारवाईबाबत आमरण उपोषणाप्रसंगी लेखी आश्वासन देऊनही राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी व प्रशासनाने कोणतीही आश्वासन पूर्ती केली नाही. त्याचबरोबर प्रांत, तहसीलदार यांनी बोलवलेल्या बैठकीत कंपनी अधिकाऱ्यांनी थातुरमातुर उत्तरे दिल्याने कंपनीचे अधिकारी, ठेकेदार व मनसैनिकांत जोरदार खडाजंगी झाली. अधिकाऱ्यांच्या उत्तरावर मनसैनिकांचे समाधान न झाल्याने पाटण तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने तालुकाध्यक्ष गोरख नारकर यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि. ७ जुलै २०२५ पासून पाटण येथील प्रांताधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार आहे.

कराड चिपळूण महामार्गाच्या रूंदीकरणाच्या कामात काही ठिकाणी बोगस व अत्यंत निकृष्ठ दर्जाची कामे झाली आहेत. रूंदीकरणाप्रसंगी तोडलेली झाडे अजूनही लावली नाहीत. कंपनीला करण्यात आलेला दहा कोटींचा दंड वसूल केला नाही. याबाबत वेळोवेळी पुराव्यानिशी मनसेने आजपर्यंत सातवेळा आंदोलने, उपोषणे केली आहेत. मात्र प्रशासनाकडून, कंपनी ठेकेदाराकडून केवळ विनंती व आश्वासने देवून आंदोलने मागे घेण्यास भाग पाडली होती. प्रत्यक्षात मात्र तद्नंतर यावर पुढे कोणतीच कार्यवाही झाली नाही. त्यामुळे आश्वासनांची पूर्तता न झाल्याने मनसैनिकांनी निवेदनाद्वारे सोमवार दि. ७ रोजी प्रांत कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता.

> प्रशासकीय बैठकीत प्रांत व तहसीलदारांनी संबंधित रस्ते विभाग अधिकारी व कंपनी अधिकारी, ठेकेदारास मागण्यांच्या कार्यवाही करण्याबाबत सूचना केल्या होत्या. मात्र कंपनी व ठेकेदाराकडून कोणतीही कार्यवाही न करता तसे लेखीही कळविले नाही. त्यामुळे आमच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत प्रांत कार्यालयासमोरील आमरण उपोषण मागे घेणार नाही.
> **- गोरख नारकर, तालुकाध्यक्ष मनसे**

या पार्श्वभूमीवर तोडगा काढण्यासाठी प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव, रस्ते विभागाचे अभियंता अधिकारी महेश पाटील यांसह एल अँड टी कंपनीचे अधिकारी, ऑल ग्रेस कंपनीचे ठेकेदार गुप्ता, कोयनेचे सपोनि ओलेकर, वनपरीक्षेत्र अधिकारी राजेश नलवडे, पाटणचे मंडलाधिकारी शिवाजीराव लुगडे यांची मनसे तालुकाध्यक्ष गोरख नारकर व मनसैनिकांसोबत बैठक आयोजित केली होती. या बैठकीत मनसे तालुकाध्यक्ष गोरख नारकर यांनी काही ठिकाणी केलेल्या मोऱ्यांच्या बांधकामांना तडे जावून निकृष्ठ झाली आहेत यावर पुरावा देवूनही कारवाई का केली नाही? एलअँडटी कंपनीला विलंबामुळे केलेला दहा कोटींचा दंड का वसूल केला नाही? कराड-चिपळूण महामार्गाच्या रूंदीकरणाचे काम दहा वर्षापासून सुरू असताना रस्त्याच्या बाजूच्या तोडलेल्या झाडांच्या ठिकाणी अद्याप एकही झाड का लावले नाही? महामार्गावरील खड्डे भरले गेले नाहीत. याशिवाय दोन आठवड्यांपूर्वी कंपनीच्या चुकीच्या व गलथान कारभारामुळे कराड-चिपळूण महामार्ग आपत्ती नसताना सध्याच्या कंपनीने आपत्कालीन परिस्थिती उद्भवली असे कारण देत तब्बल पंधरा दिवस बंद केला होता. या मानवनिर्मित परिस्थितीला सर्वस्वी संबंधित ठेकेदार व राष्ट्रीय रस्ते विभाग जबाबदार आहे. त्या कंपनीवर व ठेकेदारावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत व एसटीचे आगाराचे तसेच लोकांचे झालेले नुकसान भरून द्यावेत, अशी मागणी करून प्रशासनासह अधिकाऱ्यांना विचारणा केली. मात्र या मुद्यांवर बैठकीत कंपनीच्या अधिकाऱ्यांना ठोस उत्तरे अथवा कागदपत्रे काही सादर करता आले नाहीत. यावेळी कंपनी व ठेकेदाराने दिलेल्या बेजबाबदार उत्तरामुळे उपस्थित आंदोलनकर्ते, पत्रकार व रस्ते विभागाचे अधिकारी, ठेकेदार यांच्यात जोरदार खडाजंगी झाली.

यावर प्रांत व तहसीलदारांनी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांना मागण्यांबाबत सत्वर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. मात्र या मागण्यांसाठी आठवेळा आंदोलने करून देखील काहीच आतापर्यंत कार्यवाही न झाल्याने व बैठकीत झालेल्या तोडग्यावर मनसैनिकांचे समाधान न झाल्याने संतप्त झालेल्या मनसैनिकांनी सोमवार दि.७ रोजी प्रांताधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणावर ठाम असल्याचे सांगितले.

# गहाळ व चोरी गेलेले ७१ मोबाईल परत ! परिमंडळ ३ कल्याण पोलिसांकडून उल्लेखनीय उपक्रम

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०५ डोंबिवली :** डोंबिवली, मानपाडा आणि विष्णुनगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे गहाळ व चोरी गेलेले एकूण ७१ मोबाईल फोन परत मिळवून देण्यात परिमंडळ ३ कल्याण पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. अंदाजे ₹१२.२८ लाख रुपयांचे मोबाईल फोन ओळख पटवून तक्रारदारांना परत करण्यात आले. सदर उपक्रमासाठी आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, संजय जाधव, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण, अतुल झेंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ कल्याण, आणि . सुहास हेमाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, डोंबिवली यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथके तयार करण्यात आली होती. ही पथके तांत्रिक कौशल्य वापरून आणि CEIR (Central Equipment Identity Register) पोर्टलच्या साहाय्याने मोबाईल शोधण्याचे काम करत होती. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे खालील प्रमाणे मोबाईल परत मिळवता आले.

**डोंबिवली पोलीस ठाणे – २३ मोबाईल**
**मानपाडा पोलीस ठाणे – २४ मोबाईल**
**विष्णुनगर पोलीस ठाणे – २४ मोबाईल**

सर्व मिळवलेले मोबाईल दिनांक ५ जुलै २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता लेवा भवन, मंगल कार्यालय, दत्तनगर, डोंबिवली (पूर्व) येथे झालेल्या कार्यक्रमात मूळ तक्रारदारांना परत देण्यात आले. या वितरण सोहळ्यास सुहास हेमाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच तिन्ही पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. हा उपक्रम केवळ चोरीला गेलेले मालमत्तेची परतफेड नसून, पोलिसांचे जनतेप्रती असलेले उत्तरदायित्व व विश्वासदर्शक संबंध याचे उत्तम उदाहरण आहे.

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

## न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी विद्यालयात दिंडी सोहळा उत्साहात संपन्न



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०४, सातारा :** श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी गजवडी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पिलानी मजरे या विद्यालयात दिंडी सोहळा उत्साहात संपन्न झाला. पंढरीची वारी म्हणजे आपल्या महाराष्ट्राची अध्यात्मिक संस्कृतीचे वैभव लाखो वारकरी ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराज यांच्या पालखी बरोबर मुखी विठ्ठल नाम घोष करत उत्साहाने आनंदाने शिस्तीत वारीत सामील होतात. हा भक्ती रसाचा वारसा विद्यार्थी - विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल पिलानी विद्यालयात दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी हातात पताका, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन हातात टाळ घेऊन मुखी विठू नामाचा गजर ज्ञानोबा माऊलीचा तुकारामाचा नामघोष करत पिलाणी गावातील परिसर दुमदुमून सोडला वृक्ष दिंडी, ग्रंथ दिंडी वारकरी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडी मधून विद्यार्थ्यांना वारकरी शिक्षणाचे धडे देण्यात आले. विद्यार्थ्यांनी हातात वृक्षाचे रोप व ज्ञानाचे प्रतीक असलेले ग्रंथ घेऊन गावातून दिंडी स्वरूपात रॅली काढली पर्यावरण संरक्षण वृक्षारोपणाचे महत्व व वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार करण्यात आला.

या उपक्रमाचे आयोजन विद्यालयाचे शिक्षक कांबळे संस्कृतीक विभाग प्रमुख वायदंडे, शिंदे, विनोद साळुंखे,डॉ मोहिते, निपाणे यांनी नियोजनबद्ध पद्धतीने केले. शाळेचे मुख्याध्यापक खराते यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम संपन्न झाला. हा कार्यक्रम सामाजिक बांधिलकी म्हणून प्रतीक ठरला असून या दिंडी सोहळ्यास संस्थेचे सचिव झणझणे, सहसचिव महेशं कदम, संचालक शिवाजी खाम कर, दिलीप साळुंखे (बापू), रामचंद्र साळुंखे (आंबा), विद्यार्थी व पालक, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## मांडवे खुर्द शाळेत चिमुकल्यांच्या वेशभूषेने वेधले लक्ष



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** पंढरीच्या वारीच्या निमित्ताने आषाढी एकादशीच्या एक दिवस अगोदर जि.प.शाळा मांडवे खुर्द शाळेतील विद्यार्थ्यांनी टाळ, मृदुंगाच्या गजरात व भगव्या पताका हाती घेत विठु नामाचा गजर करीत दिंडी सोहळ्याचे आयोजन शाळेतील शिक्षकवृंदांनी बाल चिमुकल्यांमध्ये अध्यात्मिकतेबरोबर सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची रुजवण होण्यासाठी केले होते. वारीच्या निमित्ताने संपूर्ण शाळेने साक्षरतेचा संदेश दिला. यावेळी शाळेतील बालगोपाळांनी वारकरी वेश परिधान केला होता. गावातील चौक, मुख्य रस्ता आदी ठिकाणी रिंगण सोहळा देखील संपन्न झाला. या दिंडी सोहळ्याने अवघा परिसर विठु नामाच्या भक्तीरसात न्हावून निघाला होता. जि.प.शाळा मांडवे खुर्द शाळेत यंदाही वारीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीचे पूजन ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक बाबाजी ढोकळे, शिक्षक संदीप झावरे, लता शिरसाठ, प्रितम बर्वे, संदिप गाडे, अंगणवाडी सेविका माया बागुल उपस्थित होते. आषाढी एकादशीच्या वारकऱ्यांना शुभेच्छा देण्यासाठी गावातील श्रीरंग गागरे, माजी सरपंच सोमनाथ आहेर, माजी सरपंच संपतराव गागरे, धालळू बागुल, विनायक जाधव, गोरक्षनाथ मिंढे, कैलास गागरे, मंगेश गागरे, योगेश आहेर, जयतेश बागुल, मनिषा हारदे, परिघा गागरे, चंद्रभागा आहेर, शकुंतला जाधव,लहुबाई आहेर व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जयवंत जाधव तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## दिवा शिळफाटा रस्त्यावरील खड्डे बुजवणार कधी? एखाद्या नागरिकांचा जीव गेल्यावर



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, दिवा (ठाणे) :** दिवा सर्कल येथे जयेश वाईन शॉप समोरच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. याकडे ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे. या रस्त्यावरून शालेय विद्यार्थी जात आहेत. खड्डे पडल्यामुळे गटाराचे दूषित पाणी आणि पावसाचं पाणी या खड्ड्यामध्ये जमा झाले आहे.

या खड्ड्यातूनच विद्यार्थ्यांना, ज्येष्ठ नागरिकांना, गरोदर महिलांना जावे लागत आहेत. हजारोच्या संख्येने दररोज इथून नागरिक प्रवास करत असतात. एखाद्या नागरिकाची कमर लचकली किंवा वाहन चालकाचा लहान मोठा अपघात झाला तर याला जबाबदार ठाणे महानगरपालिका असेल?

आता तरी दिवा प्रभाग समिती ते सहाय्यक आयुक्त याची दखल घेणार का? एखाद्या नागरिकाची मृत्यू होण्याची वाट पाहणार का? असे दिव्यातील नागरिक म्हणत आहेत. दिवा शहरात ८ माजी नगरसेवक आहेत. दररोज या रस्त्यावरून ते जात येत असतात. तरीसुद्धा त्यांचं लक्ष नाही. निवडणुका आल्या की रस्त्यावर उतरायचं आणि नागरिकांचे लक्ष वेधून घ्यायचे हेच काम हे करतात का? असे दिव्याचे नागरिक म्हणत आहेत. लवकरात लवकर ठाणे आयुक्तांनी याची दखल घ्यावी. दिवा-शिळ फाटा रस्त्यावरचे खड्डे बुजवून नागरिकांना दिलासा द्यावा.

# मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'निर्मल दिंडी', 'चरणसेवा' आणि 'आरोग्यवारी' उपक्रमाचा समारोप

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०५, पंढरपूर :** सर्व संतांनी निसर्गप्रेमाचा आणि स्वच्छतेचा संदेश दिला आहे, आपल्या नद्यांवर, निसर्गांवर प्रेम करायला शिकवले आहे. त्यामुळे विठुमाऊलीच्या दर्शनाला येताना त्यांचा संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचे काम निर्मल दिंडीच्या माध्यमातून वारकरी करतात, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.पंढरपूर पंचायत समिती आवारात ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्यावतीने आयोजित श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा 'निर्मल दिंडी' तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रम आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या 'आरोग्यवारी' उपक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पणन मंत्री जयकुमार रावल, कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार समाधान आवताडे, अभिजित पाटील, गोपीचंद पडळकर, सचिन कलशेट्टी, डॉ.बाबासाहेब देशमुख, देवेंद्र कोठे, विक्रम पाचपुते, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, लाखो वारकरी विठुरायाच्या दर्शनाची आस लाऊन पंढरपूर येथे पोहोचतात. वारी दरम्यान वारकऱ्यांना येणाऱ्या अडचणीचा विचार करुन २०१८ वर्षीपासून निर्मलवारी सुरुवात केली. याअंतर्गत पालखी मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली. सर्व दिंडीमधील वारकऱ्यांनी या संकल्पनेचा स्वीकार केला, त्यामुळे पालखी तळावर घाणीचे साम्राज्य दिसत नाही. महिलांची मोठ्या प्रमाणात सोय झाल्यामुळे वारीमध्ये त्यांची संख्या वाढलेली आहे. आपली वारी निर्मल, स्वच्छ झाली आहे.ग्रामविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने निर्मलवारी संकल्पना यशस्वीरित्या राबविली, त्याचबरोबर निर्मल दिंडीच्या माध्यमातून लोककलावंत लोकजागर करुन स्वच्छतेबाबतचा संदेश घरोघरी पोहचविण्याचे काम करीत असतात. विठुरायाच्या दर्शनाची आस लावून चालणाऱ्या पावलांची सेवा करून विठुरायांच्या चरणाची सेवा केल्याचे प्रत्यंतर यावे, या सेवाभावाने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाद्वारे चरणसेवा उपक्रम राबवून वारकऱ्यांचे सेवा केली. त्यांचे आरोग्य आरोग्य व्यवस्थित ठेवण्याचे काम केले. वारीच्या दरम्यान महिलांना येणाऱ्या मासिक पाळीसह इतर अडचणीचा विचार करता महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या 'आरोग्यवारी' उपक्रमाच्या माध्यमातून महिला वारकऱ्यांची विशेष काळजी घेण्याचा प्रयत्न केला. याकरीता आवश्यता त्या सुविधा उपलब्ध करुन अतिशय सुंदर नियोजन केले, असे मुख्यमंत्री म्हणाले. पुणे, सातारा आणि सोलापूर प्रशासनाने वारकऱ्यांना



अतिशय चांगल्या सुविधा उपलब्ध केल्याबद्दल तसेच निर्मल दिंडी, चरणसेवा, आरोग्यवारी यशस्वी केल्याबद्दल प्रशासन, सेवाभावी संस्था आदींचे त्यांनी अभिनंदन केले.

वारकऱ्यांची सेवा ही मोठी संधी असून वारीचे चांगल्या प्रकारचे नियोजन करण्याचे प्रशासनाला निर्देश देण्यात आले होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्हा प्रशासनाला सोबत घेऊन वारीचे अतिशय उत्तम नियोजन केले. वारकऱ्यांना जर्मन हँगरच्या माध्यमातून राहण्याची व्यवस्था, महिलांकरीता स्वच्छतागृहासह स्नानगृह, पायाचे मसाज अशा आवश्यक त्या सर्व सुविधा वारकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला, नवीन उंची गाठत एक उच्चांक निर्माण केला आहे. त्यामुळे यावर्षीच्या वारीचे वेगळेपण पहायला मिळत आहे. सेवा कधीच संपत नसते, सेवेचे नवीन उच्चांक गाठायचे असतात. याकरिता प्रयत्नपूर्वक वारकऱ्यांची सेवा केली पाहिजे, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

### वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न - ग्रामविकास मंत्री

श्री. गोरे म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वारी सर्वोत्तम व्हावी, वारकऱ्यांना त्रास होता कामा नये. याकरिता त्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. आषाढी वारी यशस्वी करण्यासाठी प्रशासनासोबत विविध सेवाभावी संस्था, विश्वस्त आदी घटकांनी अहोरात्र कामे करत मनोभावी सेवा करीत आहे. वारकऱ्यांकरिता पालखीतळावर सुविधा देण्याच्या दृष्टीने जर्मन हँगरसह, वैद्यकीय सुविधा, महिलांकरिता शौचालय, स्वच्छतागृहे, मसाज मशीन आदी सर्वोत्तम सुविधा वारकऱ्यांना देण्याचा प्रयत्न केला. वारी दरम्यान प्रशासनाच्यावतीने केलेल्या व्यवस्थेबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे श्री. गोरे म्हणाले.

श्रीमती चाकणकर म्हणाल्या, देहू, आळंदी, मुक्ताईनगर, त्र्यंबकेश्वर यांसह विविध भागातून महिला वारकरी वारीत सहभागी होतात. अशा या सहभागी महिलांच्या मासिक पाळी आदी आरोग्य आणि स्वच्छताविषयक बाबींचा विचार करुन महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ४ वर्षापासून 'आरोग्य वारी' प्रशासनाच्या सहकार्याने उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत महिलांकरिता हिरकणी कक्ष, ३७५ ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन वितरण, नॅपकिन बर्निंग इन्सिनरेशन आदी सुविधा उपलब्ध करुन दिल्या, असे श्रीमती चाकणकर म्हणाल्या.मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले, जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या चरण सेवेचे महत्त्व लक्षात घेता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून पालखी सोहळ्यात कक्षाच्यावतीने प्रथमच 'चरणसेवा' उपक्रम राबविण्यात आला. २ कोटी ७५ हजार वारकऱ्यांची चरणसेवा करण्यात आली. लोकसहभातून एकूण २ कोटी रुपयाहून अधिक निधी उपलब्ध झाला. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या ९ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी सेवा केली, चरणसेवा सेवा उपक्रमाबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे श्री.नाईक म्हणाले.श्री. जंगम म्हणाले, 'निर्मल दिंडी' उपक्रमाअंतर्गत सुमारे ११ हजार शौचालय, १५५ हिरकणी कक्ष, स्तनदा माताकरिता हिरकणी कक्ष, सॅनिटरी नॅपकिन, नॅपकिन बर्निंग इन्सिनरेशन, लहान बालकांकरिता खेळणी वस्तू आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. स्वच्छतेच्या कामाकरिता सुमारे १ हजार २३६ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे, असेही श्री. जगंम म्हणाले. यावेळी श्री. फडणवीस यांच्या हस्ते स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले, तसेच निर्मल दिंडी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व कलाकारांचा सत्कार करण्यात आला.मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या वतीने पालखी सोहळ्यात राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाच्या यशस्वीतेकरिता काम केलेल्या अधिकारी, सेवाभावी संस्था, कार्यकर्त्यांचा तसेच आरोग्यवारी उपक्रमात उल्लेखनीय काम केलेल्या संस्थांचा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी पंढरपूरचे उप विभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, विकास अधिकारी सुशील संसारे आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमात 'निर्मल दिंडी', 'चरणसेवा' आणि 'आरोग्य वारी' उपक्रमाबाबत माहितीपट दाखविण्यात आले.

## बाजीराव विहीर येथे पार पडले उभे आणि गोल रिंगण

### लक्ष लक्ष नयनांनी अनुभवला रिंगण सोहळा



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०५, पंढरपूर :** आषाढी यात्रेकरीता पंढरपूच्या दिशेने निघालेल्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील गोल व तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील उभे रिंगण शुक्रवारी बाजीराव विहिरीच्या जवळ रंगले. आनंदाने वारकरी विठू नामाच्या जयघोषात नृत्यामध्ये तल्लीन झाले होते.

**पालखी सोहळा वाखरी मुक्कामी विसावला**

संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळयातील सोलापूर जिल्ह्यातील दुसरे उभे रिंगण तर चौथे गोल रिंगण बाजीराव विहीर येथे पार पडले. यानंतर सायंकाळी पालखी सोहळा पंढरपूरच्या वेशीवर असलेल्या वाखरी पालखी तळ येथे विसावला. शनिवार, दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी वाखरी येथून दुपारी पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. पंढरपूरच्या वेशीवर पालखी सोहळे आल्याने भाविक पांडुरंगाचा जयघोष करीत आहेत.

बाजीराव विहीर परिसरात रिंगणाचा सोहळा वारकर्यांनी अनुभवला. रिंगण सोहळ्याचा आनंद महामार्गाच्या उड्डाणपुलावरून भाविकांना घेता आला. या भव्यदिव्य रिंगण सोहळ्यामुळे शेकडो किलोमीटर अंतर पायी आलेल्या वारकर्यांचा शीण गेला.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने सावळ्या विठूरायाच्या दर्शनासाठी राज्यासह, देशाच्या विविध भागातून निघालेल्या संतांच्या पालख्या दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी वाखरीत दाखल झाल्या. तत्पुर्वी, दुपारी १ वाजता भंडीशेगाव येथून संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा पंढरीच्या दिशेने प्रस्थान ठेवला. त्यापूर्वी संत सोपान काका यांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे निघाला. त्यानंतर पिराची कुरोली येथून जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा निघाला होता. पालखी सोहळ्यातील वारकर्यांनी संतांच्या पालख्यांचे दर्शन घेत आपापल्या सोहळ्यात सहभाग घेतला. संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा उभे रिंगणसाठी बाजीराव विहीर समोर आला. उडाणपूलाच्या शेजारील सर्व्हिस रस्त्यालगत लागलेले रिंगण पाहण्यासाठी वारकर्यांनी उड्डाणपुलावर गर्दी केली होती. दुपारी ४ वाजता उभे रिंगण पूर्ण झाले. त्यापूर्वी मैदानावर वारकर्यांनी फुगड्या, सुरपाट्यांच्या खेळासह, भारुडांचे कार्यक्रम सुरु केले होते.

रिंगण पाहण्यासाठी वाखरीच्या पालखी तळावर दाखल झालेल्या विविध संतांच्या दिंडी सोहळ्यातील हजारो वारकरी बाजीराव विहीर परिसरात दाखल झाले होते. तर सायंकाळी ५ वाजता संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा रिंगण स्थळी आला. यानंतर सेवेकर्यांनी टाळमृदंगाचा तालावर खांद्यावरून पालखी नाचवत रिंगण पाहण्यासाठी थांबलेल्या वारकर्यांच्या भोवतीने गोल रिंगण घातले. त्यानंतर मानाच्या दिंड्यांनी झेंडा घेऊन रिंगणात प्रदक्षिणा पूर्ण केल्यानंतर अश्वस्वार रिंगणाला सुरवात झाली. अश्वांनी तीन फेर्या पुर्ण करत रिंगण पुर्ण केले. रिंगण पुर्ण होताच अश्वांच्या टापाची माती कपाळी लावण्यासाठी भाविकांची झुंबड उडाली.

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अधिवेशन ७ ऑगस्ट रोजी गोव्यात



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ ला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दहावे महाअधिवेशन गोवा येथे (गोवा) राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दहावे महाअधिवेशन डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी इन्डोअर स्टेडीयम, गोवा युनिव्हर्सिटी जवळ, सांताक्रुज, गोवा येथे दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी होत आहे. गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि सहकारमंत्री सुभाष शिरोडकर यांना अधिवेशनाचे निमंत्रण दिले आहे , बाकीच्या केंद्र व राज्याच्या प्रमुख पाहुण्यांना अधिवेशनास निमंत्रित करण्यात येणार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध मागण्या मंजूर करुन घेण्यासाठी ७ ऑगस्ट ला राष्ट्रीय ओबीसी महासंघ अधिवेशन घेत असते.

केंद्र सरकारने तात्काळ जातनिहाय जनगणना करावी. आरक्षणाची मर्यादा ५० टक्के वरून हटविण्यात यावी व लोकसंखेच्या प्रमाणात आरक्षण देण्यात यावे. ओबीसींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटचे वाटप करून स्वतंत्र केंद्रीय ओबीसी मंत्रालयाची स्थापना करण्यात यावी. स्वातंत्र्य, समता, बंधुता, आदर आणि प्रतिष्ठेसह सामाजिक, आर्थिक, व राजकीय न्याय मिळवण्यासाठी भारतीय राज्यघटनेचे रक्षण, जतन आणि खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्यात यावी. दिनांक ४ मार्च २०२१ च्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार रद्द करण्यात आलेले ओबीसीचे स्थानिक स्वराज्य संस्थामधील राजकीय आरक्षण पूर्ववत सुरु करण्याकरिता संविधानाच्या कलम २४३ डी (६) व कलम २४३ टी (६) मध्ये सुधारणा करून देशातील ओबीसीना लोकसंखेच्या प्रमाणात २७ टक्के राजकीय आरक्षण लागू करण्यात यावे. १३ सप्टेंबर २०१७ पासून क्रिमीलेयरची मर्यादा वाढलेली नाही. ओबीसी समाजाला लावण्यात आलेली क्रीमिलीयरची घटनाबाह्य अट त्वरित रद्द करण्यात यावी व ती रद्द होईपर्यंत क्रीमिलीयरची मर्यादा २० लाख करण्यात यावी. प्रत्येक जिल्हा आणि तालुका स्तरावर ओबीसी मुली आणि मुलांसाठी आवश्यकतेप्रमाणे स्वतंत्र वसतिगृहे स्थापन करण्यात यावी. ओबीसी समाजाला लोकसभा व विधानसभेत राजकीय आरक्षण लागू करण्यात यावे व लोकसभा आणि विधानसभेत ओबीसी समाजासाठी स्वतंत्र मतदारसंघ स्थापन करण्यात यावे. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार बहाल करण्यात यावा. ओबीसी प्रवर्गातील शेतकरी आणि शेतमजुरांना वयाच्या ६० वर्षानंतर पेन्शन योजना लागू करण्यात याव्यात. केंद्र व राज्य सरकारी कार्यालयातील ओबीसी संवर्गातील रिक्त पदांचा अनुशेष भरण्यासाठी स्वतंत्ररित्या मोहीम राबवून त्वरित रिक्त पदे भरण्यात यावी व त्यासाठी सक्तीचा कायदा करण्यात यावा.

ओबीसी प्रवर्गाचा ॲट्रॉसिटी कायद्यामध्ये समावेष करण्यात यावा ओबीसी समाजातील शेतकऱ्यांना वनहक्क पट्ट्यासाठी तीन पिढ्यांची अट रद्द करण्यात यावी. कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र बजेट आणि स्मार्टगाव योजना लागू करण्यात यावी. केंद्र सरकारने वार्षिक अंदाजपत्र तयार करतांना एस.सी., एस.टी. प्रमाणे ओबीसी प्रवर्गाकरिता लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात यावी. ओबीसी, एस सी, एस टी साठी आरक्षण विधेयक पारित करून घटनेच्या ९ व्या अनुसूची मध्ये समाविष्ट करण्यात यावे.

तसेच गोवा राज्यातील सबंधित ओबीसी समाजाच्या प्रमुख मागण्या खालील मागण्या घेऊन ओबीसी समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावे. शैक्षणिक संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाची कडक अंमलबजावणी करावी. सरकारी नोकरभरतीत ओबीसी आरक्षणाचे योग्य प्रमाण राखावे. राजकीय आरक्षणाला घटनादुरुस्ती करून स्थैर्य द्यावे. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची उभारणी करावी. ओबीसींसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना लागू करावी. व्यावसायिक शिक्षणासाठी ओबीसींना आर्थिक साहाय्य योजना सुरू करावी. ओबीसींच्या आर्थिक सर्वेक्षणासाठी आयोग नेमावा. ओबीसी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी मोफत सुविधा. शेती व्यवसायात ओबीसी शेतकऱ्यांसाठी विशेष योजना लागू करावी, ओबीसी समाजासाठी सामूहिक सभागृहाची उभारणी करावी. ओबीसींसाठी वैद्यकीय व आरोग्य योजना, मागासवर्गीय मुला-मुलींसाठी विवाह प्रोत्साहन योजना लागू करावी. वरील सर्व मागण्याकडे केंद्र आणि राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि त्या सर्व मागण्या पूर्ण करण्यासाठी या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दहावे महाअधिवेशन डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी इन्डोअर स्टेडीयम, गोवा युनिव्हर्सिटी जवळ, सांताक्रुज, गोवा. येथे ७ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न होणार आहे. या महाअधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रेस द्वारे डॉ.बबनराव तायवाडे अध्यक्ष राष्ट्रीय ओबीसी महासंघ राष्ट्रीय, महासचिव सचिन राजुरकर, गोवा राज्याचे अध्यक्ष मधु नाईक, महासचिव सर्वेश बंदोडकर, उपाध्यक्ष नोनू नाईक, गुरुदास सवाल , प्रसाद नागवेकर, बेनी झेवियर, नौभत वैद्य यांनी केले.

## अन्न व औषध प्रशासनाची कार्यवाही; दुकानामधून केला जातो गुटखा सप्लाय

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.०५, हिमायतनगर (नांदेड) :** सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन कार्यालय, नांदेड येथील पथकाने हिमायतनगर शहरात चालू असलेल्या अवैध गुटख्या संदर्भात माहिती मिळताच अचानक भेट देऊन शहरातील प्रणव किराणा स्टोअर्स व सलीम किराणा स्टोअर्स या किराणा दुकानांची तपासणी केली.

तपासणी वेळी मे. प्रणव किराणा स्टोअर्स, दीक्षाभूमी चौक, हिमायतनगर या पेढीतून दीपक हरिश्चंद्र अमृतसागर वय वर्ष २८ रा. कालिका नगर हिमायतनगर या व्यक्तीच्या ताब्यातून राजनिवास सुगंधीत पानमसाला, विमल पान मसाला, डायरेक्टर स्पेशल पानमसाला, मुसाफिर पान मसाला, सागर पानमसाला, गुटखा, विविध प्रकारचे सुगंधीत तंबाखू इत्यादी प्रतिबंधित अन्न पदार्थाचा एकूण २७ हजार ६८८ रुपये प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केला. संबंधित हजर व्यक्ती दीपक हरिश्चंद्र अमृतसागर वय वर्ष २८ रा. कालिका नगर, हिमायतनगर यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा अधिकारी ऋषिकेश मरेवार यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६चे कलम २६,२७,३०(२)(अ),५९ भारतीय न्यायसंहितेच्या १२३,२२३,२७४,२७५ कलमानुसार पोलीस स्टेशन, हिमायतनगर येथे फिर्याद दाखल केली आहे.

## पाथर्डी शाळेचे विद्यार्थी रमले विठ्ठलाच्या नामस्मरणात

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०५, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वारकरी संप्रदायाच्या महान परंपरेची जाणीव जागृती होऊन संस्कारक्षम पिढी घडावी या उद्देशाने बाळ गोपाळांच्या वारकऱ्यांची दिंडी गावात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यामध्ये विठ्ठल, रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत जनाबाई, टाळकरी, विणेकरी, वारकरी अशा विविध वेशभूषा करून आलेल्या भव्य दिव्य दिंडीचे गावभरात माता माऊलींनी औक्षण करून पालखीचे स्वागत व पूजन केलं. याप्रसंगी सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा, माजी सरपंच, ग्रामस्थ यांनी विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ पालखीचे पुजन, दर्शन करून श्रीफळ फोडून पुष्पहार अर्पण करून भव्य दिव्य स्वागत केले. माऊली माऊली ज्ञानोबा माऊली विठ्ठल विठ्ठल अशा विठ्ठलमय भक्तिमय वातावरणात विद्यार्थी रंगून गेले. कार्यक्रमाचा शेवट सर्व विद्यार्थी, ग्रामस्थ, वारकऱ्यांना केळी व चहा वाटप करून करण्यात आला. या दिंडीसाठी शाळेच्या वतीने मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, सहशिक्षक धनंजय गव्हाणे, सरोजिनी पोते, मनीषा पवार, सुरेखा भावले यांनी परिश्रम घेतले. आरती करून दिंडीची सांगता करण्यात आली.


॥ झाडू संतांचे मार्ग ॥ करू पंढरीचा स्वर्ग ॥

पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर

स्वच्छ भारत अभियान स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) स्वच्छ सर्वेक्षण 2025 व माझी वसुंधरा 6.0

आषाढी यात्रा 2025

यात्रेकरुंना व भाविकांना नम्र आवाहन

माझ्या विठ्ठलाची पवित्र पंढरी

स्वच्छ,सुंदर,हरित ठेवण्याची माझ्यासह प्रत्येकाची जबाबदारी

पंढरपूर हे भुवैकुंठ नगरी आहे. या भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरूंचे हार्दिक स्वागत आहे. या नगरीचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणेकरीता खालील सुचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

1) यात्रेकरू,दिंडीकरी,फडकरी, भाविक भक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर 65 एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे.
2) उघड्यावर शौचास बसु नये प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेले तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयाचा वापर करावा.
3) शौचालयात पुरेशा पाण्याचा वापर करावा.
4) **पत्रावळी व द्रोणचा वापर :-** जेवणाकरीता थर्मोकोल,प्लॉस्टिकच्या पत्रावळी वापरू नये त्याएवजी पर्यावरणपूरक विघटन होणाऱ्या पत्रावळयांचा,द्रोणचा वापर करावा व प्लॉस्टिक कॅरीबॅगचा वापर टाळावा पर्यावरणाचा समतोल साधावा.
5) **कचरा व्यवस्थापन :-** आपल्या मठ/संस्था इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ.तीन टिपामध्ये ओला, सुका व घातक असा वेगवेगळा साठवून ठेवावा हे नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्ये द्यावा. रस्त्यावर व उघड्यावर कचरा टाकु नये.
6) नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये. नगरपरिषदेच्या नळाचे किंवा पिण्याच्या पाण्याच्या टॅकरचे पाणी प्यावे.
7) शिळे अन्न, नासकी फळं व उघड्यावरील पदार्थ खाऊ नये.
8) धोकादायक इमारतीमध्ये राहू नये.
9) **पार्कींग व्यवस्था ठिकाणे :-** भिमा बस स्टँड मोहोळ रोड . ६५ एकर मागील बाजु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुल,अंबाबाई पटांगण, इसबावी विसावा पार्किंग, वेअर हाऊस पार्किंग, यमाई तुकाई पार्किंग, विडारी बंगला पार्किंग, गजानन महाराज मठ क्र.१, एलआयसी ऑफीस पार्किंग, सुलभ शौचालय पार्किंग, गाडगेबाबा चौक, भक्त निवास, तुळशी वृंदावन शेजारी, ५२ एकर पार्किंग, वाखरी, खादी ग्रामोद्योग,६५ दिंडी परिसर वाहन,सखुबाई कन्या प्रशाला पार्किंग इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**वरील सुचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.**

(श्री.सचिन इथापे)
प्रशासक
नगरपरिषद पंढरपूर

(श्री.महेश रोकडे)
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर

# मुंबईची ओळख असणारे 'कबुतर खाने' लवकरच हद्दपार होणार...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०४, मुंबई :** मुंबई आणि कबुतर यांची एक वेगळीच ओळख आहे. मुंबईतील अनेक भागांमध्ये कबुतर खाने आहेत, ज्या परिसराची ओळख या कबुतर खान्यामुळे होते. अनेक मुंबईकर या कबुतर खान्याला भेट देऊन कबुतरांना खायला देतात. पण आता राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे मुंबईतील कबुतरखाने नाहीसे होणार आहे.

राज्य सरकारने बृहन्मुंबई महानगरपालिकेला मुंबईतील कबुतरखाने तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत. गुरुवारी महाराष्ट्र विधान परिषदेत हा मुद्दा उपस्थित करताना शिवसेना नेत्या आणि नामांकित विधान परिषद सदस्या मनीषा कायंदे म्हणाल्या की, या कबुतरखान्यांच्या विष्ठा आणि पंखांमुळे श्वसनाचे आजार होतात, त्यामुळे जवळपास राहणाऱ्या लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो आहे. कौन्सिलच्या आणखी एका नामांकित सदस्या आणि भारतीय जनता पक्षाच्या नेत्या चित्रा वाघ म्हणाल्या की, कबुतरांच्या विष्ठेमुळे होणाऱ्या श्वसनाच्या आजारामुळे त्यांचा जवळचा नातेवाईक मृत्युमुखी पडल्याची माहिती दिली.

नगरविकास मंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने उत्तर देताना मंत्री उदय सामंत म्हणाले की, शहरात ५१ कबुतरखाने आहेत. कबुतरांना खायला देण्याच्या धोक्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे. महानगरपालिकेला एका महिन्याच्या आत कबुतरखान्यांविरुद्ध जागरूकता मोहीम सुरू करण्यास सांगितले जाईल. कबुतरखाने बंद करण्याची प्रक्रिया त्वरित सुरू करण्याचे निर्देश बीएमसीला देण्यात येणार आहे.

याबाबत मंत्री उदय सामंत म्हणाले की, दादरमधील प्रसिद्ध कबुतरखाना दोन दिवसांसाठी बंद होता, पण लोकांनी त्याचे पालन न केल्याने आणि कबुतरांना खायला घालत राहिल्याने ते पुन्हा उघडण्यात आले.

एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात शिंदे म्हणाले की,



सांताक्रूझ पूर्व, सांताक्रूझ पश्चिम आणि दौलत नगर येथे अनधिकृत कबुतरखाना बंद करण्यात आले आहेत. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, एक महिन्यापूर्वी, दिल्लीत कबुतरांच्या विष्ठेविरुद्ध एका १३ वर्षीय शालेय विद्यार्थ्याने याचिका दाखल केली होती. या याचिकेवर, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिल्ली सरकार, दिल्ली महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उत्तर मागितले होते.एनजीटी च्या खंडपीठाचे नेतृत्व करणारे न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव यांनी या प्रकरणाची सुनावणी ८ ऑक्टोबरपर्यंत तहकूब केली आहे.

दरम्यान कबुतरांच्या विष्ठेमध्ये असलेले धोकादायक जीवाणू अन्नातून विषबाधा होऊ शकतात आणि अतिसंवेदनशीलता न्यूमोनिटिस सारख्या गंभीर आजारांचा धोका वाढवू शकतात. अलिकडेच, पुणे आणि दिल्लीसारख्या शहरांमध्ये कबुतरांना खायला दिल्याबद्दल दंड आकारला जात असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. पण यावर कोणतीही कठोर कारवाई केली जात नाही.

## थोडक्यात बातम्या

# खामसवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर प्रजोक्त माने यांचे अमरण उपोषण सूरु



**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.०४, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील ग्रामस्थ प्रजोक्त माने यांनी ग्राम पंचायत कार्यालयासमोर विविध मागण्यांकरिता आमरण उपोषणास बसलेले आहेत. यामध्ये मौजे खामसवाडी येथील शिवपुर वस्तिवरील दहण शेड व स्मशान भूमी सुरक्षा भिंत बांधकामात अनियमितता व अपहारची चौकशी तात्काळ करण्यात यावी. तसेच संचिकेतील आवश्यक कागदपत्रकावर टेंडर स्वीकृत करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या दिसून येत नाहीत. तसेच करार पत्र (चुकीचा मुद्रांक) बाँडवरती जानेवारी २०२३ मध्ये निवडून आलेल्या सरपंचाला मार्च २०२२ चा बॉड करारपत्रा साठी जोडता येतो का?, तसेच यावरून ठेकेदार ग्रामपंचायतीस काम मंजूर होण्यापूर्वी एक वर्ष व सरपंच पदी निवड होण्यापूर्वी चुकिच्या मुद्रांक बाँडवरती करार पत्रक कसे केले?, शासन नियमाप्रमाणे हा प्रकार चालतो का?, संचकेमधील दस्ताची खातर जमा करून देयके आदा करणे आवश्यक होते. तशी कुठली ही कार्यवाही झालेली दिसून येत नाही, सदरील कामात अनियमित्ता करून सरपंच, ग्रामसेवक, उपाभियंता बांधकाम संबंधीत लेखा विभाग व गटविकास अधिकारी हे सर्व संमतीने व संगणमताने खोट्या व बोगस कागदपत्रे आधारे देयक आदा करुन अपहार केला असल्याचे उपोषण कर्ते प्रज्योत माने यांनी केला आहे.सदरील मागण्या घेऊन श्री प्रज्योत माने हे उपोषणास बसले असून दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी त्यांच्या उपोषणाचा तिसरा दिवस होता. त्यांच्या मागण्यावर अद्यापही तोडगा निघाला नसल्याने ते उपोषणावर ठाम आहेत. या आमरण उपोषणास शिराढोण पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक धरनिधर कोळेकर, यांच्यासह पोलिसांनी भेट दिली असुन आरोग्य तपासणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र मोहा येथील डॉक्टर तपासणी करत आहेत. सदरील मागण्यांवर प्रशासनकडून जोपर्यंत कार्यवाही होत नाही. तोपर्यंत उपोषण सुरू रहाणार असल्याचे उपोषणकर्ते प्रज्योत माने यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी सोलर कृषीपंप धोरणात सुधारणा आवश्यक
# आ.मुनगंटीवार यांची विधानसभेत मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, मुंबई :** शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधताना राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सोलर कृषीपंप धोरणात सुधारणा करण्याची गरज अधोरेखित केली.

विविध भागातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता, शेतकऱ्यांच्या गरजेनुसार एजी पंप देण्याची मागणी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार मुनगंटीवार यांनी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे केली. आमदार मुनगंटीवार यांनी सीआरआय कंपनीच्या सोलर पंपांबाबत आलेल्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे व दुरुस्तीच्या विलंबाकडे विधानसभेत लक्ष वेधले.

सोलर पंप उपयुक्त आहेत, मात्र जेथे सोलर पंप काम करत नाहीत, तेथे एजी पंप द्यावेत,' अशी मागणी त्यांनी रेटून धरली. या चर्चेला



उत्तर देताना महाराष्ट्राच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सोलर पंपांच्या सबसिडी व कार्यक्षमता बाबत माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या दालनात लवकरच उच्चस्तरीय बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

**शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे –**

आ. सुधीर मुनगंटीवार हे नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहेत. याआधी त्यांच्या पुढाकारातून चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विक्रमी २०२ कोटी रुपयांचा पीक विमा मिळवून देण्यात आला होता. अलीकडेच २० हजार हेक्टर प्रमाणे प्रत्येकी दोन हेक्टर धानाच्या बोनससंदर्भातील त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

९३ कोटी रुपयांचा बोनस जिल्ह्यासाठी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत त्यांची संवेदनशीलता, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि लढण्याची तयारी हेच त्यांच्या कार्यशैलीचे खरे वैशिष्ट्य आहे.

# रिक्षा चालकांच्या अडीअडचणी बाबत परिवहन अधिकारी यांना निवेदन



**अक्षराज : गणेश जाधव,**

**दि.०४, नेरूळ (नवी मुंबई) :** नवी मुंबई रिक्षा संघर्ष समिती मार्फत रिक्षा चालकांना भेडसावत असलेल्या समस्येबाबत, नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे यांना निवेदन देण्यात आले.

**रिक्षा चालकांच्या प्रमुख मागण्या -**

सिएनजी टेस्टींग दर कमी करणे, रिक्षा फिटनेस सर्टिफिकेट बाबत होणार्या अडचणी, रिक्षा परमिट रिनीवल बाबत होणार्या अडचणी, नवीन रिक्षा परवाने बंद करणे.

अशा अनेक अडीअडचणी बाबत नवी मुंबई रिक्षा संघर्ष समिती मार्फत सहा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे यांच्याशी सकारात्मक चर्चा होऊन ज्या स्थानिक कार्यालय अधिकारात ज्या अडचणी असतील त्या संबंधित अधिकारी यांच्याशी चर्चा करून सोडवण्यात येतील असे आश्वासन परिवहन अधिकारी यांनी दिले. रिक्षा परमिट बंद करणे व सिएनजी बाटला टेस्टींग दर कमी करण्यासंदर्भात तातडीने पत्र-व्यवहार करून मार्ग काढण्यात येईल. असे नवी मुंबई रिक्षा संघर्ष समितीला सांगण्यात आले. या बैठकीला नवी मुंबई रिक्षा संघर्ष समिती मार्फत सम्माननीय,विजय पाटील, राजाराम दांगट, प्रदीप भोसले, युवराज पाटील, सचिन लकडे, कैलास चक्कर, भाऊसाहेब दांगट, लालचंद्र यादव तसेच दैनिक अक्षराज तर्फे प्रतिनिधी गणेश जाधव उपस्थित होते.

# ३ दुकान फोडीचा प्रयत्न; पोलिसांकडून तत्काळ बंदोबस्त

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०३, धाराशिव :** धाराशिव शहरातील सराफ लाईन परिसरातील तिरुपती ज्वेलर्स, विघ्नहर्ता ज्वेलर्स आणि राधा ज्वेलर्स या ३ दुकानांमध्ये दिनांक ०३ जुलै २०२५ रोजी रोजी पहाटे दुकान फोडीचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकारामुळे व्यापाऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच जिल्हा सराफ सुवर्णकार असोसिएशन फेडरेशनचे अध्यक्ष दत्ता माळी, जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष तानाजी मुंडे, कार्यकारी अध्यक्ष कृष्णा डहाळे व योगेश शहाणे यांनी घटनास्थळी भेट दिली. सकाळी ७ वाजता पीडित दुकानदारांसह पदाधिकाऱ्यांनी शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. यानंतर फेडरेशनच्यावतीने पोलीस अधीक्षक आणि पोलीस निरीक्षक शेख यांना संपूर्ण माहिती देण्यात आली. पोलीस अधीक्षक यांनी सर्व सराफ बांधवांची मागणी ऐकून घेऊन बंदोबस्त वाढवण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार शहर पोलीस निरीक्षकांनी सराफ लाईन परिसरात दोन हत्यारबंद पोलीस गस्तीसाठी नेमले. या तात्काळ कारवाईबद्दल संघटनेच्या वतीने पोलीस अधिकाऱ्यांचे आभार मानण्यात आले. यावेळी दत्ता माळी, तानाजी मुंडे, कृष्णा डहाळे, मयूर जालनेकर, कृष्णा नाईकनवरे, राजेश कदम, रघुवीर चित्राव, सच्चिदानंद पोद्दार, तसेच इतर पदाधिकारी व सराफ व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आषाढी एकादशीनिमित्त वारकरी दिंडी उत्साहात निघाली

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०५, कुंडलवाडी (नांदेड) :** दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी कुंडलवाडी येथील के रामलू पब्लिक स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त वारकरी दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी शाळेतील नर्सरी ते दुसरी पर्यतच्या चिमुकल्याणी वारकऱ्यांचे पोशाख परिधान केले होते. कोणी विठोबा, कोणी रुक्मिणी तर कोणी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव तर कोणी वासुदेव बनले होते. सकाळी शाळेमध्ये विठ्ठल प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या संतांचे अभंग, भक्ती गीते याप्रसंगी सादर केली. त्यानंतर शाळेच्या विद्यार्थ्यांची पालखी मिरवणूक या शाळेतील प्रांगणामध्ये घेऊन पायी वारी करण्यात आली. एरवी शाळेच्या गणवेशात असलेले लहान मुलं आज मात्र वारकऱ्यांप्रमाणे डोक्यावर टोपी, गळ्यात टाळ, कपाळी गंध आणि नऊवारीत आलेल्या मुली केसात गजरा, डोक्यावर तुळस आणि 'विठ्ठल नामाची शाळा भरली, शाळा शिकताना तहानभूक हरली,' या अभंगाप्रमाणे विठ्ठल रखुमाईच्या भक्तीत दंग झाले.

# पंढरपूर येथे 'कृषी पंढरी' कृषी प्रदर्शनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन
# ५ वर्षात कृषी क्षेत्रात २५ हजार कोटींची गुंतवणूक करणार

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०५, पंढरपूर :** शेतकऱ्याला शेती फायद्याची व्हावी. यासाठी उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढावी असा राज्य शासनाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आगामी काळात शेतीच्या सर्व फिडरचे सौरऊर्जिकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या योजनेत महाराष्ट्रात सोलापूर जिल्हा प्रथम असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित 'कृषी पंढरी' कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कृषीमंत्री अॅड. माणिकराव कोकाटे, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पणन मंत्री जयकुमार रावल, आमदार विजय देशमुख, आमदार रणजीत मोहिते पाटील, गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, विभागीय कृषी सह संचालक दत्तात्रय गावसाने आदी उपस्थित होते. उत्पादन खर्च कमी होणे आणि उत्पादकता वाढावी.

यासाठी राज्य शासन अनेक योजना राबवित आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत गाव हा घटक धरून जलसंधारण, जलनियोजन पासून शेतीच्या यांत्रिकीकरणापासून बाजारसाखळी तयार करण्यापर्यंत पिकाचे एकात्मिक व्यवस्थापन अशा सर्व बाबी गावात पूर्ण करून गावातला छोट्यातला छोट्या शेतकऱ्याला सर्व शासकीय योजनांचा लाभ होईल असा प्रयत्न करण्यात आला आहे. नुकतेच पिक विमा योजना सुधारित केली आहे. श्री.फडणवीस पुढे म्हणाले, शेतीच्या क्षेत्रात यावर्षीपासून येत्या ५ वर्षात दरवर्षी ५ हजार अशी २५ हजार कोटी रुपये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ठिबक संच, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, पंप आदी देण्यात येणार असून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. गतकाळात निर्णय घेतल्याप्रमाणे साडेसात अश्वशक्ती पर्यंतच्या कृषी पंपांचे वीज बिल आकारले जात नाही.पांडुरंगाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी शेतकऱ्यांना शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, योजनांची आणिते मोठ्यातला शेतकरी अशा सर्वांना त्यांचा लाभ घेण्याची माहिती मिळावी.

यासाठी कृषी प्रदर्शन भरवावे अशी अपेक्षा सुधाकरपंत परिचारक यांनी २०१५ साली व्यक्त केली होती. तेव्हापासून दरवर्षी हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. यामध्ये शासनाचे विविध विभाग, कृषी विद्यापीठे यांचे स्टॉल, विविध योजना, वेगवेगळ्या व्यावसायिकांनी आणि शेतकऱ्यांनी केलेल्या यशस्वी प्रयोगांचाही या प्रदर्शनात समवेत आहे. एकात्मिक कीड नियंत्रणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात




'एआय'चा वापर, उत्पादकता वाढविण्यासाठीच्या वेगवेगळी पद्धतींचेही प्रदर्शन या ठिकाणी पहायला मिळत आहे. सेंद्रिय खते, नैसर्गिक खते, वेगवेगळ्या खतांचे मिश्रणे, माती परीक्षण ते कापणीपर्यंत पर्यंतच्या वेगळगवेगळ्या तंत्रज्ञानाची झलक येथे पाहायला मिळते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पणनच्या योजनांचा लाभ बाजार समित्यांच्या माध्यमातून मिळत आहे. गावातील विकास सहकारी संस्थांचे बहुउद्देशीय संस्थात रूपांतरण करण्याचा केंद्र शासनाच्या प्रयत्न असून १८ प्रकारचे व्यवसाय या संस्थाना करता येणार आहेत. बाजार आणि शेतकऱ्यांमध्ये दुवा ठरण्याचे काम या संस्था करतील.

स्टोरेज, कोल्ड स्टोरेज आदी व्यवस्था करून शेतकऱ्यांच्या माल योग्य भावात मोठ्या प्रमाणात माल विकला जाईल असा प्रयत्न असल्याचेही श्री.फडणवीस म्हणाले.पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती अत्यंत प्रगतिशील असून अत्यंत चांगले काम करते. समितीने पणन विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेऊन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले. अॅड. कोकाटे म्हणाले, वारकरी आणि शेतकरी हे वारीच्या दोन बाजू आहेत.

शेतीत येणाऱ्या तंत्रज्ञानाची वारीत सहभागी शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी चांगले प्रदर्शन भरविण्यात आले आहे. शेती चांगली आणि सुरळीत करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे. या प्रदर्शनात सुमारे २५० स्टॉलच्या माध्यमातून शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, पीएमएफएमई योजना, आत्मा, स्मार्ट प्रकल्प आदींची माहिती व प्रदर्शन केले आहे.

या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा.सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी अत्यंत चांगली शेती करतात. केळीची निर्यात मोठी प्रमाणात होते. माशीमुळे डाळिंब आणि इतर फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी बॅगेज, ठिबक, मल्चिंग पेपर आदी योजनांचा फलोत्पादन साठी शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ही त्यांनी केले.राज्य आणि केंद्र सरकार मिळून शेतकरी स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. आपल्याला एआय मध्ये मोठे काम करायचे आहे. त्यासाठी राज्य शासनाने कृषी मध्ये ५००, कोटींची तरतूद केली आहे, असेही अॅड. कोकाटे म्हणाले.श्री. रावल म्हणाले, पंढरपूर बाजार समिती ही उत्कृष्ट बाजार समिती आहे.

केळीचे सर्वात मोठे निर्यात हब सोलापूर जिल्हा आहे. मनुके, द्राक्ष, डाळिंबाच्या क्षेत्रात प्रगती करणारा हा जिल्हा आहे. ड्रॅगन फ्रुटचे लागवड करण्याचे धाडस या तालुक्यात झाले आणि ते यशस्वीही करण्यात आले. लवकरच एडीबीची योजना राज्यात आणण्याचा प्रयत्न होणार आहे. यामध्ये मार्केट कमिटीची बळकटी करण्यासाठी योजना आणण्यासाठी प्रयत्न होणार. त्यात पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला प्राधान्य देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. प्रशांत परिचारक यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, ही बाजार समिती एक अग्रेसर बाजार समिती आहे. ५५० कोटीच्यावर उलाढाल या बाजार समितीच्या माध्यमातून केली जाते. बेदाण्याचे मोठे मार्केट या बाजार समितीत आहे. चांगल्या प्रकारची शेती या भागातील शेतकरी करतात. मुख्यमंत्री यांनी पंढरपूर हे भविष्यकाळातील एक मोठे तीर्थक्षेत्र होण्यासाठी ध्यास घेतला आहे. प्रशासनाने आषाढी वारीचे अत्यंत चांगले नियोजन केले, असेही ते म्हणाले. यावेळी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड, उपसभापती राजू गावडे संचालक मंडळ आदी उपस्थित होते.